# ‘प्रसिध्दी पत्रक’

# पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद

**गुरुवार, दि.१९/०९/२०१९**

---

### “भुम: मद्य पाजले नाही म्हणुन मारहान.”

**पोलीस ठाणे, भुम:** दि. १७.०९.२०१९ रोजी १७.३० वा. सु. भुम येथे १) तुकाराम श्रीराम बरकडे २) आबा बरकडे दोघे रा. देवांग्रा, ता.परंडा यांनी संगणमत करुन “तु आम्हाला दारु का पाजत नाही?” असे म्हणुन परमेश्वर उर्फ भैय्या अशोक गोयकर रा. आरसोली, ता.भुम यांना शिवीगाळ करुन लाथा-बुक्क्यांनी मारहान केली. तर तुकाराम बरकडे याने त्यांच्या डोक्यात दगड मारुन जखमी केले. अशा मजकुराच्या परमेश्वर उर्फ भैय्या गोयकर यांच्या फिर्यादीवरुन वरील आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, भुम येथे भा.दं.वि. कलम ३२३, ३२४, ५०४, ३४ प्रमाणे गुन्हा दि. १८.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

### “उस्मानाबाद: दागीने खरेदीचा बहाणा करुन दोन सराफा दुकानांत दागीने चोरी.”

**पोलीस ठाणे, आनंदनगर:** दि. १७.०९.२०१९ रोजी १५.४५ वा. सु. पु.ना. गाडगीळ आणि सन्स लि., उस्मानाबाद, या दुकानात दागीने खरेदी करण्याचा बहाना करुन अज्ञात व्यक्तींनी दुकानातील २७.४८० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागीने किं.अं. १,००,१०९/- रु. चोरुन नेले आहेत. अशा मजकुराच्या मंजुशा सचिन कदम, सेल्स गर्ल, पु.ना. गाडगीळ आणि सन्स लि., उस्मानाबाद यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द पोलीस ठाणे, आनंदनगर येथे भा.दं.वि. कलम ३८०, ३४ प्रमाणे गुन्हा दि. १८.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**पोलीस ठाणे, उस्मानाबाद (शहर):** दि. १७.०९.२०१९ रोजी १५.१५ वा. सु. भागवत ज्वेलर्स, गवळी गल्ली, उस्मानाबाद या दुकानात दागीने खरेदी करण्याचा बहाना करुन अज्ञात व्यक्तींनी दुकानातील ७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागीने किं.अं. २७,०१०/- रु. चोरुन नेले आहेत. अशा मजकुराच्या भागवत उत्तमराव थडवे यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द पोलीस ठाणे, उस्मानाबाद (शहर) येथे भा.दं.वि. कलम ३८० प्रमाणे गुन्हा दि. १९.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

### “मौजे ईटकळ: सोन्या-चांदीचे दागीने व रोख रकमेची चोरी.”

**पोलीस ठाणे, नळदुर्ग:** दि. १७.०९.२०१९ रोजी २३.३० ते दि. १८.०९.२०१९ रोजी रात्री ०२.३० वा. चु दरम्यान इमरान काशीम शेख रा. ईटकळ, ता.तुळजापूर यांच्या खोलीचा दरवाजा ढकलून आत प्रवेश करुन कोणीतरी अज्ञात चोरट्याने कपाटात व पत्र्याच्या पेटीमधील ५५.५ ग्रॅम सोन्याचे दागीने किं.अं. १,३७,५००/- रु., १९.५ तोळे चांदीचे दागीने किं.अं. ४,३२०/- रु. व रोख रक्कम ५,६००/- रु. असा एकुण १,४७,४२०/- रु. किंमतीचा माल चोरुन नेला. तसेच परिसरात राहणारे नागनाथ मारुती लकडे यांच्या घरी चोरी करण्याचा प्रयत्न केला. अशा मजकुराच्या इमरान शेख यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द पोलीस ठाणे, नळदुर्ग येथे भा.दं.वि. कलम ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दि. १८.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

### “मौजे चिखली: कंटेनर ट्रक-कारचा अपघात.”

**पोलीस ठाणे, बेंबळी:** दि. १६.०९.२०१९ रोजी १९.३० वा. चे दरम्यान १) आबुजर युनुस शेख २) शाहीदाबेगम युनुस शेख दोघे रा. केशेगाव, ता.जि.उस्मानाबाद हे कार क्र. एम.एच. ४३ एबी ५३८० मधुन उस्मानाबाद ते केशेगाव जात असतांना चिखली चौरस्ता येथे कंटेनर क्र. एम.एच. ४६ एफ ७३४१ च्या अज्ञात

चालकाने कंटेनर निष्काळजीपणे, भरधाव वेगात चालवुन त्यांच्या कारला जोराची धडक दिली. यात आबुजर शेख व शाहीदाबेगम शेख हे जखमी होउन त्यांच्या कारचे नुकसान झाले. अशा मजकुराच्या आबुजर शेख यांनी वैद्यकीय उपचारादरम्यान दिलेल्या जबाबावरुन (एम.एल.सी.) वरील कंटेनर ट्रकच्या अज्ञात चालकाविरुध्द पोलीस ठाणे, बेंबळी येथे भा.दं.वि. कलम २७९, ३३७, ३३८ प्रमाणे गुन्हा दि. १९.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## “मोटारसायकलची स्कुटरला धडक.”

**<u>पोलीस ठाणे, उस्मानाबाद (ग्रामीण):</u>** दि. १६.०९.२०१९ रोजी १४.३० वा. सु. अज्ञात चालकाने राष्ट्रीय महामार्ग क्र. ५२ वर, विमानतळ फाट्याजवळ मोटारसायकल क्र. एम.एच. २५-२११५ निष्काळजीपणे चालवुन स्कुटर क्र. एम.एच. २५-६८८४ ला पाठीमागुन धडक दिली. या धडकेने स्कुटर वरील बालिका गणेश सावंत रा. उस्मानाबाद या खाली पडुन जखमी झाल्या. अशा मजकुराच्या बालिका सावंत यांनी वैद्यकीय उपचारादरम्यान दिलेल्या जबाबावरुन (एम.एल.सी.)वरील मोटारसायकलच्या अज्ञात चालकाविरुध्द पोलीस ठाणे, उस्मानाबाद (ग्रा.) येथे भा.दं.वि. कलम २७९, ३३७, ३३८ सह मो.वा.का. कलम १८४ प्रमाणे गुन्हा दि. १८.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## “मौजे कौडगाव: शेतातील विद्युत पंप बंद केल्याच्या कारणावरुन मारहान.”

**<u>पोलीस ठाणे, परंडा:</u>**. शिवाजी महादेव वायकुळे रा. कौडगाव हे दि.२८.०८.२०१९ रोजी २०.०० वा. सु त्यांच्या शेतात जात असतांना १) आत्माराम महादेव वायकुळे २) शितल आत्माराम वायकुळे दोघे रा. कौडगाव, ता.परंडा यांनी त्यांना “आमचा विद्युत पंप का बंद केला?” असा जाब विचारुन शिवाजी वायकुळे व त्यांचा मुलगा समाधान या दोघांना शिवीगाळ करुन मारहान केली व जिवे ठार मारण्याची धमकी दिली. यात आत्माराम वायकुळे याने शिवाजी वायकुळे यांना काठीने मारहान केल्याने त्यांच्या हाताचे हाड मोडले. अशा मजकुराच्या शिवाजी वायकुळे यांच्या फिर्यादीवरुन वरील आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, परंडा येथे भा.दं.वि. कलम ३२५, ३२३, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दि. १८.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## “जुगार अड्ड्यावर छापा.”

**<u>पोलीस ठाणे, येरमाळा:</u>** सुरज भारत मोरे रा. येरमाळा, ता.कळंब हे दि. १८.०९.२०१९ रोजी १४.४५ वा.सु. मौजे येरमाळा येथे कल्याण मटका जुगार खेळत असतांना जुगाराचे साहित्यासह रोख रक्कम ८००/रु. च्या मालासह पोलीस ठाणे, येरमाळा यांच्या पथकास आढळुन आले. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, येरमाळा येथे म.जु.का. कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दि. १८.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**<u>पोलीस ठाणे, येरमाळा:</u>** १) सुरेश बाळासाहेब पवार रा. येरमाळा, ता.कळंब २) समीर दस्तगीर शेख रा.उपळाई, ता.कळंब हे दि. १८.०९.२०१९ रोजी १७.०० वा.सु. मौजे येरमाळा येथे कल्याण मटका जुगार खेळत असतांना जुगाराचे साहित्यासह रोख रक्कम ३,२००/रु. च्या स्थानिक गुन्हे शाखा (LCB), उस्मानाबाद यांच्या पथकास आढळुन आले. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, येरमाळा येथे म.जु.का. कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दि. १८.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**<u>पोलीस ठाणे, येरमाळा:</u>** १) हणुमंत दुधाजी शिंदे २) पांडुरंग सिद्राम चंदणशिवे ३) बापु साहेबराव डोंगरे ४) मामु दासू डोंगरे ५) औदुंबर भागवत जगताप ६) दत्तात्रय महादेव मैंदाड ७) मामु अच्युत खंडागळे सर्व रा. चोराखळी, ता.कळंब हे दि. १८.०९.२०१९ रोजी १७.१५ वा.सु. मौजे चोराखळी येथे तिरट जुगार खेळत असतांना जुगाराचे साहित्य, चार मोबाईल फोन एकत्रीत किं.अं. ११,०००/-रु. व रोख रक्कम २,१७०/रु. असा

एकुण १३,१७०/- रु. च्या मालासह पोलीस ठाणे, येरमाळा यांच्या पथकास आढळुन आले. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, येरमाळा येथे म.जु.का. कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दि. १८.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**"मोटार वाहन कायदा-नियमांचे उल्लंघन: ८५ कारवाया."**

**उस्मानाबाद जिल्हा:** दि. १८/०९/२०१९ रोजी उस्मानाबाद जिल्हयातील १८ पोलीस ठाणी व जिल्हा वाहतुक शाखा उस्मानाबाद यांनी वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांविरुध्द मोटार वाहन कायद्याच्या विविध कलम-नियमांनुसार ८५ कारवाया केल्या असुन त्यातुन १८,३०० ₹ **'तडजोड शुल्क'** वसुल करण्यात आले आहे.

---

**स्वाक्षरीत**

सहा.पोलीस निरीक्षक

जनसंपर्क विभाग,उस्मानाबाद